महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३०७३ Email ID : seva4.fd@maharashtra.gov.in

---

क्रमांक : न्यायाप्र २०२५/प्र.क्र.२७ /सेवा-४ दि. ०१/१०/२०२५

प्रति,

संचालक,
लेखा व कोषागारे, मुंबई

Received
01/10/2025

विषय : निवृत्तिवेतन अंशराशीकृत भागाची देय रक्कम वसूल करावयाचा कालावधी कमी करण्यासाठी दाखल करण्यात येणाऱ्या याचिकांसंदर्भात.

संदर्भ : आपले पत्र क्र.संलेवको-२०२५/व.ले./निवृत्तीवेतन(संगणकीकरण)/२१८/१६३/३९७५, दि.२३.०९.२०२५.

महोदय,

निवृत्तिवेतन अंशराशीकरण पुनर्स्थापना कालावधी १५ वर्षा ऐवजी १२ वर्षे होणेबाबत विविध न्यायालयीन प्रकरणामध्ये अंशराशीकरणाच्या रक्कम वसुलीस स्थगिती देण्याबाबत आदेश मा.न्यायालयाकडून देण्यात येतात, सदर न्यायालयीन आदेशाच्या अंमलबजावणीच्यादृष्टीने मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.११६४/२०२५ मध्ये दि.१८.०३.२०२५ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशामध्ये अंशराशीकरणाच्या वसुलीस स्थगिती दिली आहे. त्या आदेशाच्या आधारे संबंधित महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे (मुंबई, औरंगाबाद, नागपूर) दाखल झालेल्या दाव्यांमध्ये न्यायाधिकरणानेही उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाच्या संदर्भ देऊन स्थगिती दिली असल्यास अशा सर्व प्रकरणी संबंधितांच्या अंशराशीकरणाच्या वसुलीस मा.उच्च न्यायालयाच्या तसेच त्या-त्या संबंधित न्यायाधिकरणाच्या अंतिम आदेशाच्या अधिन स्थगिती देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

आपली,

(मनिषा कामटे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन